सामना पा. नं. १

## सर्व चोरांची आडनावे मोदी कशी?

# राहुल गांधी यांना दोन वर्षांची शिक्षा

सुरत/नवी दिल्ली, दि. २३ (वृत्तसंस्था) - 'सर्व चोरांची आडनावे मोदी कशी असतात?' असे वक्तव्य काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी २०१९च्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात केले होते. याप्रकरणी दाखल झालेल्या मानहानी खटल्यात गुजरातमधील सुरत जिल्हा व सत्र न्यायालयाने राहुल गांधी यांना दोन वर्षांची शिक्षा ठोठावली. त्यानंतर तातडीने जामीन मंजूर केला आणि शिक्षेला ३० दिवसांची स्थगिती दिली आहे. दरम्यान, या निर्णयाचे तीव्र पडसाद उमटले असून, काँग्रेस पक्ष उच्च न्यायालयात आव्हान देणार आहे.

२०१९च्या लोकसभा निवडणूक प्रचारावेळी कर्नाटकात कोलार येथील सभेत बोलताना सर्व चोरांची आडनावे मोदी कशी काय असतात? असा सवाल राहुल गांधी यांनी केला होता. या वक्तव्यावरून गुजरातमधील भाजप आमदार पुर्णेश मोदी यांनी त्यांच्याविरुद्ध सुरत सत्र न्यायालयात मानहानीचा खटला दाखल केला होता. राहुल गांधींनी संपूर्ण मोदी समुदायाचा अपमान केल्याचे पुर्णेश मोदी यांनी याचिकेत म्हटले होते.

**राहुल गांधी न्यायालयात हजर**

आज सुरत जिल्हा सत्र न्यायालयात सुनावणी पार पडली. यावेळी न्यायालयात राहुल गांधी हजर होते. तेव्हा सत्र न्यायाधीश एच. एच. वर्मा यांनी तुम्हाला काही मत मांडायचे आहे का? असे राहुल गांधींना ▌पान २

### माझा भाऊ घाबरणारा नाही : प्रियंका



काँग्रेस सरचिटणीस प्रियंका गांधी-वढेरा यांनी केंद्र सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आहे. 'हे घाबरलेले सरकार साम, दाम, दंड आणि भेद वापरून राहुल गांधींचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करत आहे. पण माझा भाऊ कधी घाबरला नाही आणि यापुढेही घाबरणार नाही. तो सत्य बोलत आला आहे आणि सत्य बोलतच राहणार. देशातील जनतेचा आवाज बुलंद करत राहू. कोट्यवधी देशवासीयांचे प्रेम राहुल गांधींच्या पाठीशी आहे', असे प्रियंका गांधींनी ट्विटमध्ये म्हटले आहे.




न्यायालयाच्या निकालानंतर राहुल गांधींनी ट्विट करीत महात्मा गांधी यांचे एक वाक्य शेअर केले आहे. 'माझा धर्म सत्य आणि अहिंसेवर आधारित आहे. सत्य हाच माझा देव आहे आणि अहिंसा हे साधन आहे', असे या ट्विटमध्ये म्हटले आहे.

सामना पा. न. ६

### बुडून मृत्यू

वसई - वसई किल्ला बंदर येथील समुद्रात मासेमारी करताना बुडून मच्छीमाराचा मृत्यू झाला. अर्नेस्ट गडेरी (५३) हा मासेमारी करण्यासाठी बोटीतून पोशापीर बेटाजवळ गेला होता. समुद्रात मासेमारी करताना जाळी टाकत असताना त्याचा पाय घसरून तो पाण्यात पडला. यातच बुडून मृत्यू झाला.

सामना पा. नं. ६

### फसवणूक

विरार - नोकरीच्या नावाखाली विरारमध्ये लाखोंची फसवणूक केल्याची घटना समोर आली आहे. विरार पश्चिम, चिखल डोंगरी रोड, रुस्तमजी ग्लोबल सिटी येथील शुभम गॅलेक्सीमध्ये राहणाऱ्या अजय गुप्ता (३२) यांच्याकडून अविनाश चौधरी, प्रमोद गुप्ता, सोनू साहनी यांनी नोकरीचे आमिष दाखवून ६ लाख ६३ हजार रुपये घेऊन फसवणूक केली होती.

CS CamScanner
Scanned with CamScanner

लोकमत पा. नं २

# विरारमध्ये तरुणीवर सामूहिक बलात्कार

## गुन्हा दाखल : दोन्ही आरोपींना अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : विरारमध्ये एका १९ वर्षीय तरुणीवर दोन नराधमांनी सामूहिक बलात्कार केल्याची धक्कादायक घटना बुधवारी संध्याकाळी साडेसातच्या सुमारास घडली आहे. विरार पोलिसांनी वेगवेगळ्या कलमांन्वये गुन्हे दाखल करून दोन्ही आरोपींना रात्री एक वाजण्याच्या सुमारास अटक केली आहे.

पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, विरारमध्ये जंगल परिसरात १९ वर्षीय पीडित तरुणी आणि तिचा प्रियकर बुधवारी संध्याकाळी बसले होते. त्यावेळी येथे आलेल्या दोन्ही आरोपींनी प्रियकराच्या गळ्यातून सोन्याचे पेंडल खेचून पळ काढला. दोघेही ते सोन्याचे पेंडल विकण्यासाठी गेले. पण, कोणीही ते विकत घेतले नाही म्हणून दोन्ही आरोपी संध्याकाळी साडेसात-आठच्या सुमारास परत त्या परिसरात गेले. त्यावेळीही प्रियकर आणि प्रेयसी तिथेच बसलेले होते. यावेळी दोन्ही नराधम आरोपींनी पीडित तरुणीवर सामूहिक बलात्कार केला. दोघेही आरोपी मजबूत देहयष्टीचे होते, तर प्रियकर किरकोळ प्रकृतीचा आहे. त्यामुळे त्याने विरोध करूनही आरोपींनी जुमानले नाही. तसेच तेथून मदतीसाठी केलेली याचनाही कुणाला ऐकू गेली नाही. त्यावेळी विरोध करताना प्रियकराने बाजूला पडलेली काचेची बाटली एका आरोपीच्या डोक्यावर मारली. त्यात आरोपी जखमी झाला. त्यानंतर दोघेही पळून गेले.



### डॉक्टरांकडून जखमी आरोपींची माहिती

ही माहिती विरार पोलिसांना मिळाल्यावर पोलिस घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी तरुणीला उपचारासाठी डॉक्टरकडे पाठविले आणि फरार दोन्ही आरोपींचा शोध घेण्यास सुरुवात केली. एक आरोपी जखमी झाल्याने जवळच्या डॉक्टरकडे उपचारासाठी गेला असेल, असा पोलिसांना संशय होता. पोलिसांनी व्हॉट्स ॲपच्या ग्रुपवर ही माहिती टाकल्यावर एका डॉक्टरांनी असा आरोपी उपचार घेत असल्याची माहिती पोलिसांना कळवली. त्यानुसार विरार पोलिसांनी रात्री एक वाजताच्या सुमारास दोन्ही आरोपींना अटक केली. दरम्यान, दोन्ही आरोपींना ताब्यात घेऊन अटक केली आहे. आरोपींवर जबरी चोरी, खंडणी, बलात्कार, अनैसर्गिक बलात्कार अशा कलमान्वये गुन्हा दाखल केल्याची माहिती पोलिस अधिकाऱ्यांनी दिली.

---

लोकमत पा. नं. २

# तरुणीवर अत्याचार



नालासोपारा : लग्नाचे आमिष दाखवून विरारमध्ये तरुणीवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना समोर आली आहे. विरार परिसरात राहणाऱ्या २६ वर्षीय तरुणीला बोरिवली येथील आरोपी तरुणाने १४ जून २०२१ ते २ जानेवारी २०२३ दरम्यान लग्नाचे आमिष दाखवून तिच्या इच्छेविरुद्ध वसईत लैंगिक अत्याचार केला होता. याबाबत आता पीडित तरुणीने आरोपीसोबत संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता तिला जीवे ठार मारण्याची धमकी देण्यात आली. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच पीडित तरुणीने बुधवारी वालीव पोलिस ठाण्यात बलात्काराचा गुन्हा दाखल केला आहे.

---

लोकमत पा. न. २

# वीजचोरीचा गुन्हा दाखल

नालासोपारा : नालासोपारा येथे २५ वीजग्राहकांविरोधात वीजचोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बिलालपाडा, संतोषी माता मंदिर परिसर, वालईपाडा येथे डिसेंबर २०२२ ते मार्च २०२३ दरम्यान २५ वीज ग्राहकांनी महावितरण कंपनीची कोणतीही परवानगी न घेता अनधिकृतपणे वीज वापर करून १८ हजार ३० युनिट वीज वापरून ३ लाख २७ हजार ६९० रुपयांचे आर्थिक नुकसान केले होते. बुधवारी तुळींज पोलिसांनी वीजचोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

# लोकलच्या धडकेत मृत्यू

CamScanner

Scanned with CamScanner

सामना पा. नं. ८

## ड्रेनेजमध्ये सापडला मृतदेह

वसई, दि. २३ (सा. वा.) – नालासोपाऱ्यात ड्रेनेजमध्ये कुजलेला मृतदेह सापडल्याची घटना आज उघड झाली. वाकणपाडा येथील चौधरी कंपनीजवळ सकाळी सडलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आला. मृतदेह पूर्ण सडल्याने तो पुरुष की स्त्री जातीचा आहे हे ओळखता आले नाही.

पेल्हार पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेहाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी जे.जे. रुग्णालयात पाठवला आहे. शवविच्छेदन अहवाल आल्यानंतर मृतदेह पुरुष की स्त्री जातीचा आहे याचा उलगडा होणार आहे. पेल्हार पोलीस या घटनेचा अधिक तपास करत आहेत.

पुढारी पु. पा. नं. २

## क्रिप्टो करन्सीच्या बहाण्याने ३३ लाखांची फसवणूक

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

मिरारोड येथील ३७ वर्षीय मोबाईल विक्रेत्याला क्रिप्टो करन्सीमध्ये गुंतवणूक करण्याच्या बहाण्याने सायबर गुन्हेगारांनी ३३ लाख ६५ हजारांची फसवणूक केली आहे.

काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीत राहणाऱ्या मोबाईल विक्रेत्याने दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की त्याला एका व्हॉटस अॅप ग्रुपमध्ये जोडले गेले आणि ग्रुपच्या अॅडमिनने त्याला क्रिप्टोकरन्सी एक्स्चेंज प्लॅटफॉर्मवर गुंतवणूक करण्यास सांगितले. त्या ग्रुप चालकाने सांगितल्याप्रमाणे तक्रारदाराने क्रिप्टो ट्रेडिंग अकाउंट तयार करण्यासाठी मोबाइल अॅप्लिकेशन डाउनलोड केले. तक्रारदाराने क्रिप्टो वॉलेटमध्ये पैसे हस्तांतरित करून अल्प प्रमाणात गुंतवणूक केली. जी रक्कम इलेक्ट्रॉनिक निधी संचयित करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या णडउढ या क्रिप्टोकरन्सीच्या प्रकारात रूपांतरित करते. त्यांना सुरुवातीला काही गुंतवणुकीवर चांगला नफा मिळाला. त्यामुळे त्याने गुंतवणूक करण्यास सुरुवात केली. काही दिवसांनी त्याला त्यामध्ये नुकसान झाले म्हणून त्याने गुंतवणूक करणे थांबवले. काही दिवसांनंतर, ग्रुप चालकाने फोन करून त्याला तज्ञ सल्लागार नियुक्त करण्यास सुचवले. सल्लागाराने दिलेल्या माहितीच्या आधारे, तक्रारदाराने ३३ लाख ६५ हजारांची गुंतवणूक केली. त्याने दोन बँकेतून व मित्राकडून कर्ज घेऊन त्यामध्ये गुंतवणूक केली होती. त्याला त्यामध्ये त्याला जास्त नफा मिळाला त्यामुळे त्याच्या वॉलेटमधील शिल्लक २४७२१० णडउढपर्यंत रक्कम वाढली. त्या सल्लागाराने ती रक्कम काही दिवस काढता येणार नाही असे सांगितले. परंतु त्यानंतर ते अॅप बंद झाल्याने त्याला पैसे काढता आले नाहीत. त्यानंतर त्याने ग्रुप अॅडमिन आणि सल्लागाराला संपर्क केला असता परंतु ते फोन उचलत नव्हते.तसेच त्याने ईमेल पाठवले त्यालाही कोणताही प्रतिसाद मिळाला नाही.

पुढारी पा. न. ५

## ठाकरे कला दालनाचे काम दिवाळीपर्यंत पूर्ण होणार

- आ. प्रताप सरनाईक यांनी घेतला कामाचा आढावा

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदर महापालिकेमार्फत बाळासाहेब ठाकरे कला दालनाचे काम सुरु असून ते ५० टक्के पूर्ण झाले आहे तर १०० टक्के काम येत्या दिवाळीपर्यंत पूर्ण होईल, असा दावा आ. प्रताप सरनाईक यांनी केला आहे. त्यांनी पालिका आयुक्त दिलीप ढोले यांच्यासह कला दालनाच्या कामाची पाहणी करून त्याचा आढावा घेतला.

कला दालनाच्या उर्वरीत कामाला गती देण्यात येत असून त्याचे लोकार्पण येत्या दिवाळीत करण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कला दालनाचे स्ट्रक्चरल काम येत्या मे महिन्यात पूर्ण होणार असून यानंतर त्यातील अंतर्गत सजावटीच्या कामाला सुरुवात केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. पालिकेच्या आरक्षित जागेत बाळासाहेब यांचे कला दालन साकारण्यासाठी सरनाईक यांनी गेल्या अनेक वर्षांपासून पाठपुरावा केला होता. त्यासाठी त्यांनी राज्य सरकारकडून निधी मंजूर करून घेतला. मात्र या कला दालनाला पालिकेतील तत्कालीन भाजप सत्ताधाऱ्यांच्या नेत्याने विनाकारण विरोध करून कामाला विलंब करण्याचा प्रयत्न चालविला होता, असा आरोप त्यांनी माजी आ. नरेंद्र मेहता यांच्यावर अप्रत्यक्षपणे केला.

पुढारी पु. पा. नं. २

## नालासोपाऱ्यात बविआतर्फे शोभायात्रा

**नालासोपारा :** वसई तालुक्यात सर्वात मोठी आणि सर्वांचे लक्ष वेधून घेणारी परिवहन समितीचे सदस्य अमित रमाकांत वैद्य यांची नववर्ष स्वागत यात्रा मोठ्या उत्साहात निघाली. अनेक महिला पारंपारिक नऊवारी साड्या नेसलेल्या भगिनी, फेटे सदरा लेंगा घातलेले पुरुष आणि विशेष आकर्षण म्हणजे राम सीता हनुमान व वेगवेगळ्या वेशातील मुले साऱ्यांचे लक्ष वेधून घेत होते. कोरोनाचे सावट दूर झाल्याने विविध ठिकाणी पाडव्याच्या शोभायात्रेची धूम बघायला मिळाली. नालासोपाऱ्यात बहुजन विकास आघाडी तर्फे गुढी पाडाव्या निमित्य भव्य शोभायात्रा काढण्यात आली होती. बहुजन विकास आघाडीचे अध्यक्ष आमदार हितेंद्र ठाकूर, नालासोपाराचे आमदार क्षितिज ठाकूर, माजी महापौर राजीव पाटील, माजी महापौर रुपेश जाधव, माजी सभापती पंकज ठाकूर आणि हेमंत म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली हि शोभायात्रा निघाली होती. या वर्षीच्या शोभा यात्रेत रामायणातील काही प्रसंग चित्ररूपाने ,नाट्यरूपाने दाखवण्यात आले.याची संकल्पना परिवहन समिती सदस्य अमित वैद्य यांची होती. शोभा यात्रेत मोठ्याप्रमांत महिलांनी सहभाग घेतला होते. शोभायात्रेची सांगता राधानगर येथे झाली. यानंतर त्याठिकाणी मनोरंजनाचे आणि सत्काराचा कर्यक्रम करण्यात आला या कार्यक्रमाला नालासोपाराचे आमदार क्षितिज ठाकूर, माजी महापौर राजीव पाटील , माजी महापौर रुपेश जाधव, माजी प्रभाग समिती सभापती भरत मकवाना, निलेश देशमुख, अतुल साळुंखे यांच्या सह अनेक माजी नगरसेवक, नगरसेविका तसेच नागरिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

CS CamScanner

Scanned with CamScanner

सकाळ पु. पा. नं. ४

# शहराला ड्रग्ज तस्करांचा विळखा

## वसईत वर्षभरात ८२५ गुन्हे दाखल; ६४३ जणांवर कारवाई

प्रसाद जोशी : सकाळ वृत्तसेवा

वसई, ता. २३ : पोलिस आयुक्तालयाच्या क्षेत्रात अमली पदार्थांची विक्री मोठ्या प्रमाणात होत आहे. यात अनेकदा परदेशी नागरिकांचादेखील सहभाग असल्याचे समोर आले आहे. हो अमली पदर्थांची तस्करी रोखण्यासाठी पोलिसांचे मिशन यशस्वी होत असून गेल्या वर्षभरात एकूण ८२५ गुन्हे दाखल झाले असून ६४३ जणांना अटक करण्यात आली आहे. या अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये परदेशी नागरिकांचे प्रमाण अधिक असल्याचे समोर आले आहे; तर पोलिसांनी मार्च महिन्यात एक कोटीहून अधिक किमतीचे ड्रग्ज जप्त केले आहेत.




वसई-विरार शहरात गेल्या काही दिवसांपासून अमली पदार्थ तस्करीचे प्रमाण वाढले आहे. यात गांजा, चरस, कोकेन, एमडी, ब्राऊन शुगर या अमली पदार्थांचे प्रमाण अधिक आहे. मोक्याची ठिकाणे शोधून या पदार्थांची विक्री केली जाते. एकदा या अमली पदार्थांचे व्यसन लागले की अमली पदार्थ मिळविण्यासाठी तरुण गुन्हेगारींकडे वळत असल्याचे अनेक घटनांमधून उघड झाले आहे. त्यामुळे पोलिस आयुक्त मधुकर पांडे यांनी अमली पदार्थांची तस्करी रोखण्यासाठी पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.

आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये अमली पदार्थ विक्री करणाऱ्यांवर कडक कारवाई केली जात आहे. तसेच नियमित कारवाई करण्यासाठी सतत बैठक घेण्यात येत आहेत. मिरा रोड, काशिमिरा, उत्तन, नवघर, भाईंदर, नया नगर, वसई, माणिकपूर, विरार, वालीव, तुळिंज, आचोळे, पेल्हार, अर्नाळा, मांडवी, नालासोपारा अशा १६ पोलिस ठाण्याच्या हद्दीत अमली पदार्थ विक्री व सेवन करणाऱ्यावर कारवाई करण्यात आली आहे.

### एमडीचे प्रमाण अधिक

मार्च महिन्यातील २० दिवसांत नालासोपारा, वसई, मिरा रोड परिसरातून कोट्यवधी रुपयांचे कोकिन, ब्राऊन शुगर, चरस, एमडी जप्त करण्यात आले आहे. तस्करी करणाऱ्यांत नायजेरियन नागरिक व एका महिलेचादेखील समावेश असल्याचे समोर आहे. मार्च महिन्यात एक कोटी ३४ लाख २६ हजार ४०० रुपयांचे अमली पदार्थ जप्त करण्यात आले. यात एमडीचे प्रमाण अधिक आहे.






व्यसनाधीनतेत तरुणाई गुरफटत चालली आहे. पोलिसांकडून योग्य कारवाई होत आहे; परंतु कुठेतरी पालक-मुलांचा संवाद कमी होत आहे, ज्यामुळे मुले संकटात पडतात. मुलांना समजून घेणारा, समजावून सांगणारा व्यक्ती हवी असते. त्यामुळे पालक-मुलांनी एकमेकांसाठी विशेष वेळ काढून मनमोकळे संवाद साधणे काळाची गरज बनली आहे.

**- अमित पटेल**, मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्वदा प्रतिष्ठान

पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत चालू वर्षात अमली पदार्थ विक्री व करणाऱ्यांवर कारवाईच्या संख्येत वाढ झाली आहे. अटक केलेल्या आरोपींमध्ये देशाबाहेरील व्यक्तींचादेखील समावेश आहे. तसेच आयुक्त मधुकर पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली शेजारी राज्यातून अंमली पदार्थ शहरात येणार नाहीत यासाठीदेखील लक्ष दिले जात आहे.

**- विशाल धायगुडे**, जनसंपर्क अधिकारी, पोलिस आयुक्तालय

### ऑनलाईन बैठक

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत अमली पदार्थांची विक्री रोखण्यासाठी सतर्क राहण्याच्या सूचना पोलिस आयुक्त मधुकर पांडे यांनी दिल्या. पोलिस आयुक्तालयाच्या जिल्हास्तरीय अमली पदार्थविरोधी कार्यकारी समितीची ऑनलाईन बैठक पार पडली यात अन्न व औषध प्रशासन, सीमाशुल्क विभाग, राज्य उत्पादन शुल्क, आरोग्य विभाग सहभागी झाले होते.

### आयुक्तांच्या सूचना

बंद पडलेल्या कंपन्या, गोडावून, कारखाने आदी ठिकाणी पोलिस पथकाने नियमित तपासणी करावी. तसेच शेजारील राज्यातून अमली पदार्थ आपल्या शहरात येणार नाहीत, याकडे लक्ष द्यावे, अशा सूचनाही पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांच्याकडून देण्यात आल्या आहेत.

लोकसत्ता पु. पा. नं. १

### महामार्गावरील पुलांना झाडांचा विळखा

**वसई :** वसई पूर्वेतील भागातून जाणाऱ्या मुंबई-अहमदाबाद महामार्गावर उभारण्यात आलेल्या उड्डाणपुलांवर अनेक छोटी मोठी झाडेझुडपे उगवली आहेत. दिवसेंदिवस या झाडाझुडपांचे प्रमाण वाढत असल्याने पूल कमकुवत होण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

वृत्त...३

लोकसत्ता पु. पा. नं. १

### आरोपींना १६ वर्षांनी अटक

**वसई :** आर्थिक वादातून २००७ मध्ये चार जणांनी एका कंपनीच्या व्यवस्थापकाची हत्या करून मृतदेह महामार्गाजवळ फेकून दिला होता. या हत्या प्रकरणात फरार असलेल्या दोन आरोपींना गुन्हे शाखा ३ च्या पथकाने तब्बल १६ वर्षांनी अटक केली आहे.

वृत्त...३

लोकसत्ता पु. पा. नं. १

### रेल्वे स्थानकांबाहेर 'हिरकणी' कक्ष

**भाईंदर :** मीरा रोड, भाईंदर रेल्वे स्थानकांबाहेर तसेच पालिका मुख्यालयात येणाऱ्या स्तनदा मातांसाठी हिरकणी कक्ष उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. एकूण तीन ठिकाणी शासनाकडून या कक्षाची उभारणी केली जाणार असून, महापालिकेने त्यांसाठी जागा उपलब्ध करून दिल्या आहेत.

वृत्त...३

CS CamScanner
Scanned with CamScanner

पुढारी पु. पा. नं. ३

# भाईंदरमध्ये दोन बालमजुरांची सुटका

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

भाईंदर पूर्वेच्या नवघर पोलीस ठाणे हद्दीत बाल मजुराकडून काम करून घेणाऱ्या दोन कंपनी मालकांवर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष, भाईंदर यांनी कारवाई करून दोन बाल मजुरांची सुटका केली आहे.

अनैतिक मानवी प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांना वी.वी.के प्लास्टीक कंपनी व प्रिन्स मेटल कंपनी, भाईंदर उद्योग नगर, मिलन हॉलच्या पाठीमागे, भाईंदर पूर्व या दोन्ही कंपनीचे चालक, मालक व मॅनेजर असे त्यांचे कंपनीमध्ये अल्पवयीन मुलांना अनधिकृतपणे कामावर ठेवून त्यांच्याकडून सक्तीने बेकायदेशीरपणे जिवीतास धोका निर्माण होईल असे काम करून घेत असल्याची माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीनुसार पो.नि. समीर अहिरराव यांनी पथकासह बी. बी. के प्लास्टीक कंपनीमध्ये एक अल्पवयीन मुलगा व प्रिन्स मेटल कंपनी, भाईंदर उद्योग नगर, मिलन हॉलच्या पाठीमागे, नवघर, भाईंदर पूर्व येथे एक अल्पवयीन मुलगा हे कंपनीमध्ये स्टील वाटी व स्टील चहा कपास हॅन्डल वसविण्याचे काम प्रेस मशीनवर करत असतांना दिसून आले. त्यावेळी कारवाई करून २ अल्पवयीन मुलांना सुरक्षिततेच्या दृष्टीने ताब्यात घेण्यात आले. त्याबाबत बी.बी.के. कंपनीचे मालक, चालक बौतुला सत्तार खान तसेच प्रिन्स मेटल कंपनीचे मॅनेजर जोखन मुन्नीलाल प्रसाद व मालक पाहिजे आरोपी नथुराम पुरोहित यांच्याविरुद्ध नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सकाळ पु. पा. नं. ४

पुण्य नगरी पा. नं. १

# राज्यात लवकरच 'लव्ह जिहाद'विरोधी कायदा

## गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विधान परिषदेत ग्वाही



**मुंबई :** 'लव्ह जिहाद'च्या आजवरच्या प्रकरणांमध्ये निश्चित अशी काही कार्यपद्धती असल्याचे प्राथमिक तपासात जाणवते. या विषयावर हजारोंचे मोर्चे निघत असताना ही केवळ बहुसंख्याकांची मागणी म्हणून त्याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. त्यामुळे राज्यात लव्ह जिहादविरोधात कायदा करण्याचे विचाराधीन आहे. त्यासाठी विविध राज्यांच्या कायद्यांचाही अभ्यास केला जात असल्याचेही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी विधान परिषदेत ▶▶ पान ८ वर...

# पेणकरपाडा दफनभूमीसाठी पर्यायी जागेचा विचार करा

## पोलिसांचे मिरा-भाईंदर महापालिकेला पत्र

भाईंदर, ता. २३ (बातमीदार) : पेणकरपाडा दफनभूमीचे आरक्षण विकसित करण्यास स्थानिकांचा विरोध आहे; पण दफनभूमीच्या जागेसाठी पर्यायी जागेचा विचार करावा, असे पत्र पोलिस प्रशासनाने मिरा भाईंदर महापालिकेला दिले. येथे दफनभूमीचे आरक्षण विकसित केल्यास कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल, असे मत पोलिस प्रशासनाने व्यक्त केले आहे.

पेणकर पाडा येथील दफनभूमीचे आरक्षण विकसित करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे; पण त्याला स्थानिक रहिवाशांनी तीव्र विरोध केला आहे. पेणकर पाडा परिसरात मुस्लिम समाजाची वस्ती नाही. त्यामुळे या ठिकाणी दफनभूमी न करता शहरात अन्य ठिकाणी ती विकसित करावी; अन्यथा आंदोलन करण्याची भूमिका ग्रामस्थांनी घेतली आहे. या मुद्द्यावर ग्रामस्थांच्या शिष्टमंडळाने नुकतीच आयुक्त दिलीप ढोले यांची भेट घेतली होती. महापालिकेने पोलिसांकडे बंदोबस्ताची मागणी केल्यानंतर पोलिसांनीही यासंदर्भात रहिवाशांचे मत जाणून घेण्यासाठी बैठक आयोजित केली होती. या बैठकीत रहिवाशांनी दफनभूमीला ठाम विरोध करून आंदोलन करण्याची भूमिका जाहीर केली. या पार्श्वभूमीवर राज्यातील सध्याची स्थिती व मुस्लिम धर्मीयांचा सुरू झालेला रमजानचा महिना लक्षात घेऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी दफनभूमीसाठी पेणकरपाडाऐवजी अन्य पर्यायी जागेचा विचार करावा, असे पोलिसांचे म्हणणे आहे.

### शहरात तीन जागी दफनभूमीचे आरक्षण

मुस्लिम समाजाला दफनभूमीच्या सध्याच्या जागा अपुऱ्या पडत असल्यामुळे शहरात उत्तन, नवघर व काशी गाव या तीन ठिकाणी दफनभूमीसाठीचे आरक्षण प्रस्तावित केले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात विविध विषयांवरील मुद्द्यावर झालेल्या बैठकीत दफनभूमीसाठी जागा आरक्षित करण्याचा प्रस्ताव महापालिकेने एक महिन्याच्या आत पाठवावा अशा सूचना केल्या होत्या. त्यानुसार महापालिकेने यासंबंधीचा प्रस्ताव मंजूर करून तो मान्यतेसाठी राज्य शासनाकडे पाठवला आहे. मात्र त्यावर अद्याप कोणताही निर्णय झालेला नाही. शासनाने हे प्रस्ताव मंजूर केले तर या वादावर पडदा पडणार आहे.

शहराला दफनभूमीची आवश्यकता आहे. ती काळाची गरज आहे. पण ती नागरी वस्तीत नसावी. दफनभूमीवरून कोणताही वाद होऊ नये, यासाठी नवीन विकास आराखड्यात महापालिकेने नागरी वस्तीपासून लांब सुचवलेल्या दफनभूमींच्या जागांचा समावेश व्हावा यासाठी पाठपुरावा सुरू आहे.

**- प्रताप सरनाईक, आमदार**

लोकसत्ता पु. पा. नं. १

# माणिकपूर दुर्घटनेतील महिलेचा मृत्यू

**वसई :** माणिकपूर येथे सज्जा कोसळून जखमी झालेल्या महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. रेणू गुप्ता (३५) असे या महिलेचे नाव आहे.

वसई पश्चिमेला माणिकपूर अर्बन बँकेसमोर एका इमारतीचे बांधकाम सुरू आहे. सोमवारी दुपारी ३.३० च्या सुमारास अचानकपणे तिसऱ्या मजल्यावरील सज्जा कोसळून थेट खाली रिक्षा थांब्यावर उभ्या असलेल्या रिक्षावर पडला.

वृत्त...३

CamScanner
Scanned with CamScanner

लोकमत

# सोशल मीडियावर 'हे' शब्द वापराल तर गुन्हा दाखल!

## व्हायरल करणाऱ्यांवरही कारवाई : अफवा न पसरवण्याचे आवाहन

मंगेश कराळे
लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : सोशल मीडियावर धार्मिक भावना दुखावतील किंवा आक्षेपार्ह शब्द वापरल्यास कोठडीची हवा खावी लागेल. त्यामुळे सोशल मीडियावर कोणतेही शब्द वापरण्यापूर्वी काळजी घेण्याचे आवाहन सायबर पोलिसांकडून करण्यात येत आहे. तसेच आक्षेपार्ह पोस्ट लिहिणाऱ्यांसह व्हायरल करणाऱ्यांविरोधातही पोलिसांकडून कारवाई करण्यात येत आहे.

कोणीही अफवा व खोट्या बातम्या व्हॉट्सॲप किंवा इतर समाजमाध्यमांवर पसरवू नयेत, तसेच त्यांच्यावर विश्वास ठेवू नये. काही मदत लागल्यास जवळच्या पोलिस ठाण्याशी संपर्क साधावा. सायबर गुन्ह्याची माहिती www.cybercrime.gov.in वर पाठवावी, असे आवाहन सायबर पोलिसांकडून करण्यात येत आहे.

### हे शब्द वापरणे टाळा

जे अपशब्द जातिवाचक उल्लेखातून असतात. असे शब्द टाळावे. ज्या शब्दातून एकापेक्षा अधिक धार्मिक किंवा जातीच्या समूहात वितुष्ट निर्माण होऊन सलोखा बिघडण्याची शक्यता असते, ते शब्द टाळावेत.

### 'या' नियमांचे उल्लंघन केल्यास...

या नियमांचे उल्लंघन केल्यास भारतीय दंड संहितेतील कलम १५३ अ आणि ब, २९५ अ, ५०५, माहिती तंत्रज्ञान कायद्यातील कलम ६६ क आणि ड आणि फौजदारी दंड संहितेतील कलम १४४ अन्वये गुन्हा नोंद केला जाईल, असे सायबर महाराष्ट्राने स्पष्ट केले आहे.

### व्हॉट्सॲप वापरकर्त्यांसाठी नियमावली

१ नियमावलीनुसार सदस्यांनी व्हॉट्सअ‍ॅप समूहात अफवा, चुकीची माहिती किंवा दोन समाजात तेढ निर्माण होईल, असा मजकूर, छायाचित्रे किंवा ध्वनी चित्रफीत पाठवू नये. त्यासोबत खात्री नसलेले साहित्यही समूहावर पोस्ट करणे टाळावे, अशा प्रकारचे साहित्य समूहास आल्यास डिलिट करावे.

२ समूह नियंत्रणाबाहेर जात असेल तर प्रामुख्याने सदस्यांचे हक्क काढून घ्यावेत आणि समूह साहित्य पाठवण्याचा हक्क स्वतःकडे घ्यावा. समूहावरील आक्षेपार्ह मजकुराबाबत पोलिसांशी संपर्क साधावा, असे सायबर पोलिसांनी नमूद केले आहे.

३ एखाद्या समाजाचे किंवा धर्मविरोधात साहित्य, पॉर्न साहित्य, समूहावर पाठवू नये. ग्रुप ॲडमिनने वेळोवेळी समूहातील घडामोडींवर लक्ष ठेवावे.

सायबर गुन्ह्याची माहिती www.cybercrime.gov.in वर पाठवावी.






Scanned with CamScanner

लोकमत

# विरारमध्ये तरुणीवर सामूहिक बलात्कार

## गुन्हा दाखल : दोन्ही आरोपींना अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : विरारमध्ये एका १९ वर्षीय तरुणीवर दोन नराधमांनी सामूहिक बलात्कार केल्याची धक्कादायक घटना बुधवारी संध्याकाळी साडेसातच्या सुमारास घडली आहे. विरार पोलिसांनी वेगवेगळ्या कलमांन्वये गुन्हे दाखल करून दोन्ही आरोपींना रात्री एक वाजण्याच्या सुमारास अटक केली आहे.

पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, विरारमध्ये जंगल परिसरात १९ वर्षीय पीडित तरुणी आणि तिचा प्रियकर बुधवारी संध्याकाळी बसले होते. त्यावेळी येथे आलेल्या दोन्ही आरोपींनी प्रियकराच्या गळ्यातून सोन्याचे पेंडल खेचून पळ काढला. दोघेही ते सोन्याचे पेंडल विकण्यासाठी गेले. पण, कोणीही ते विकत घेतले नाही म्हणून दोन्ही आरोपी संध्याकाळी साडेसात-आठच्या सुमारास परत त्या परिसरात गेले. त्यावेळीही प्रियकर आणि प्रेयसी तिथेच बसलेले होते. यावेळी दोन्ही नराधम आरोपींनी पीडित तरुणीवर सामूहिक बलात्कार केला. दोघेही आरोपी मजबूत देहयष्टीचे होते, तर प्रियकर किरकोळ प्रकृतीचा आहे. त्यामुळे त्याने विरोध करूनही आरोपींनी जुमानले नाही. तसेच तेथून मदतीसाठी केलेली याचनाही कुणाला ऐकू गेली नाही. त्यावेळी विरोध करताना प्रियकराने बाजूला पडलेली काचेची बाटली एका आरोपीच्या डोक्यावर मारली. त्यात आरोपी जखमी झाला. त्यानंतर दोघेही पळून गेले.



### डॉक्टरांकडून जखमी आरोपींची माहिती

ही माहिती विरार पोलिसांना मिळाल्यावर पोलिस घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी तरुणीला उपचारासाठी डॉक्टरकडे पाठविले आणि फरार दोन्ही आरोपींचा शोध घेण्यास सुरुवात केली. एक आरोपी जखमी झाल्याने जवळच्या डॉक्टरकडे उपचारासाठी गेला असेल, असा पोलिसांना संशय होता. पोलिसांनी व्हॉट्स ॲपच्या ग्रुपवर ही माहिती टाकल्यावर एका डॉक्टरांनी असा आरोपी उपचार घेत असल्याची माहिती पोलिसांना कळवली. त्यानुसार विरार पोलिसांनी रात्री एक वाजताच्या सुमारास दोन्ही आरोपींना अटक केली. दरम्यान, दोन्ही आरोपींना ताब्यात घेऊन अटक केली आहे. आरोपींवर जबरी चोरी, खंडणी, बलात्कार, अनैसर्गिक बलात्कार अशा कलमान्वये गुन्हा दाखल केल्याची माहिती पोलिस अधिकाऱ्यांनी दिली.

Mumbai Main
Page No. 4 Mar 24, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

लोकमत

# लग्नास नकार देणाऱ्या प्रियकराचे समुपदेशन, पोलिस ठाण्यातच निकाह

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : पैसे खर्च करण्यासाठी, कपडे खरेदी करण्यासाठी व घराचे भाडे देण्यास पैसे नसल्याने सध्या लग्न करू शकत नसल्याने लग्नास नकार देणाऱ्या एका प्रियकराचे समुपदेशन करत पोलिसांनी चक्क तुळींज पोलिस ठाण्यातच गुरुवारी संध्याकाळी विवाह लावला. पोलिसांनी पैसे, प्रियकराला कपडे घेऊन दिल्यानंतर दोघांच्या संमतीने दोन मौलानांच्या मदतीने निकाह पार पाडला. या निकाहाची सर्वत्र चर्चा होती.

प्रियकर लग्नास नकार देत असल्याची तक्रार नोंदवण्यासाठी २१ वर्षीय तरुणी तुळींज पोलिस ठाण्यात गुरुवारी दुपारी आली होती. यावेळी तुळींजचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक शैलेंद्र नगरकर यांनी तक्रारीचे सविस्तर कारण जाणून घेतले आणि तरुणाचे समुपदेशन करत लग्नाचा बार उडवून दिला.

> तरुणीच्या प्रियकराचे समुपदेशन केल्यावर तो लग्नाला तयार झाला होता. यानंतर दोघांचा मुस्लीम समाजाच्या रितीने पोलिस ठाण्यात विवाह करण्यात आला. कपडे खरेदी करून देऊन त्याला मेहेर देण्यात आले. त्याला नोकरी मिळावी, यासाठीही प्रयत्न सुरू आहेत.
>
> - शैलेंद्र नगरकर, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, तुळींज पोलिस ठाणे

मिळालेल्या माहितीनुसार, दोन वर्षांपूर्वी २१ वर्षीय मुस्लीम तरुणीची तिच्याच परिसरातील एका मुस्लीम तरुणाशी ओळख झाली होती. या ओळखीचे रुपांतर प्रेमात झाले. तरुणी आठ महिन्यांची गर्भवती झाल्याने तरुणीने प्रियकराला लग्नाचा तगादा लावला होता. प्रियकर लग्नास टाळाटाळ करू लागला. त्यामुळे तरुणीने गुरुवारी दुपारी थेट तुळींज पोलिस ठाणे गाठले आणि आपले गाऱ्हाणे वरिष्ठ पोलिस निरीक्षकांना सांगितले.

तेव्हा प्रियकरालाही पोलिसांनी बोलावून घेतले. त्याचे समुपदेशन झाल्यावर तो लग्नाला तयार झाल्यावर पोलिसांनी लग्नासाठी नवीन कपडे आणले. गुरुवारी संध्याकाळी पाच वाजण्याच्या सुमारास दोन काझींनी तरुणी आणि तरुणाचा खुदमा व कलमा वाचून निकाह लावला. यावेळी परिसरातील प्रतिष्ठित नागरिक, पोलिस ठाण्यातील अधिकारी व अंमलदार हजर होते.

Hello Vasai
Page No. 4 Mar 24, 2023
Powered by: erelego.com

Scanned with CamScanner

लोकमत

# १६ वर्षे फरार आरोपी भावांना उत्तराखंडमधून केली अटक

## आर्थिक व्यवहाराच्या वादातून झाली होती हत्या

लोकमत न्यूज नेटवर्क

नालासोपारा : माणिकपूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत १३ डिसेंबर २००७ साली आर्थिक व्यवहाराच्या वादातून एकाची हत्या करून त्याचा मृतदेह झाडे-झुडपात टाकून दिलेला आढळला होता. याप्रकरणी तब्बल १६ वर्षांनी गुन्हे शाखेच्या युनिट-३च्या पथकाने दोन्ही आरोपी भावांना उत्तराखंड राज्यातून २० मार्चला अटक केली आहे. दोन्ही आरोपी भावांचा ताबा अधिक तपासासाठी माणिकपूर पोलिसांना गुन्हे शाखेने दिला आहे.

१३ डिसेंबर २०१७ साली सकाळी मुंबई-अहमदाबाद हायवेवर गुरुकृपा हॉटेलसमोर, कर्नालपाडा गावाकडे जाणाऱ्या रोडच्या बाजूला अंदाजे ३० ते ३५ वयोगटातील पुरुषाचा मृतदेह आढळला होता. त्यावेळी माणिकपूर पोलिसांनी हत्या व हत्येचा पुरावा नष्ट केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला होता. तपासादरम्यान मयताची ओळख संजय विनोद झा (वय ३२) असल्याचे निष्पन्न झाले होते.

वरिष्ठांनी केलेले मार्गदर्शन व सूचनेप्रमाणे गुन्हे शाखा युनिट-३ च्या पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाद्वारे प्राप्त माहितीच्या आधारे आरोपी पुरणसिंग प्रतापसिंग उन्योनी ऊर्फ पुरणसिंग कापूरसिंग परिहार (४१) आणि मोहनसिंग प्रतापसिंग उन्योनी ऊर्फ मोहनसिंग कापूरसिंग परिहार (३८) या दोन्ही आरोपी सख्ख्या भावांना उत्तराखंडातील बागेश्वर येथून २० मार्चला ताब्यात घेतले होते. ही कामगिरी पोलिस उपायुक्त (गुन्हे) अविनाश अंबुरे, सहा. पोलिस आयुक्त अमोल मांडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक प्रमोद बडाख, पोलिस उपनिरीक्षक उमेश भागवत, शिवाजी खाडे, हवालदार अशोक पाटील, मुकेश तटकरे, शंकर शिंदे, सचिन घेरे, सागर बारवकर, मनोज सकपाळ, आश्विन पाटील, राकेश पवार, सुमित जाधव, प्रवीण वानखेडे, सागर सोनवणे, गणेश यादव, संतोष चव्हाण यांनी पार पाडली.




गुन्हे शाखेच्या युनिट-३च्या पथकाने दोन आरोपी भावांना उत्तराखंड राज्यातून अटक केली आहे. आरोपींसह पोलिस अधिकारी-कर्मचारी.

### हत्या केल्याची दिली कबुली

आरोपीकडे अधिक तपास केला असता आरोपींनी त्यांचा साथीदार संजय झा याच्याशी झालेल्या आर्थिक व्यवहाराच्या वादातून हत्या केल्याचे कबूल केले आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.



Scanned with CamScanner

pratahkal.com

प्रात

# 16 साल के बाद हत्या के दो आरोपी चढ़े क्राईम ब्रांच के हत्थे

**प्रात:काल संवाददाता**

**मुंबई।** वसई पश्चिम स्थित मानिकपुर पुलिस थाना क्षेत्र में एक व्यक्ति की हत्या के मामले में 16 साल बाद हत्याकांड की गुत्थी सुलझाते हुए क्राईम ब्रांच यूनिट 03 ने दो आरोपियों को उत्तराखंड से गिरफ्तार किया है। हत्यारे दोनों सगे भाई है।

16 साल से अपनी पहचान छुपाकर पुलिस से भागते फिर रहे थे। वही अन्य आरोपियों की तलाश में जुटी हुई है। बता दे की वर्ष 2007 में मानिकपुर में एक व्यक्ति की हत्या कर दी गई थी। इस मामले में मानिकपुर पुलिस थाना में अज्ञात हत्यारों के खिलाफ हत्या का मामला दर्ज कर छानबीन कर रही थी। शुरुआती जांच पड़ताल में पुलिस के हाथ कोई खास सफलता हाथ नहीं लगी। उसके बाद समय समय पर पुलिस छानबीन करती रही लेकिन हाथ कुछ नही लगा।आखिकार पूरे 16 साल के बाद मीरा भाईंदर वसई-विरार पुलिस आयुक्तालय के क्राईम ब्रांच के हाथ सफलता मिली। यूनिट 03 के पीआय प्रमोद बड़ाख को कुछ अहम जानकारियां प्राप्त हुई। पक्की और गुप्त सूचना मिली के दोनों हत्यारे उत्तराखंड के रहने वाले होने खबर सामने आई। उसके बाद क्राईम ब्रांच यूनिट की टीम उत्तराखंड गयी। आरोपियों के लोकेशन ट्रेस कर पुलिस ने हत्यारों के बीच कुछ दिनों चली लूकाछुपी के बाद टीम ने आखिरकार दो आरोपियों को पकड़ने में सफलता हाथ लगी। फिलहाल पुलिस ने पुरणसिंग प्रतापसिंग उन्योनि उर्फ पुरणसिंग कापूरसिंग परिहार (41) और मोहनसिंग प्रतापसिंग उन्योनि उर्फ मोहनसिंग कापूरसिंग परिहार (38) को हत्या के आरोप में गिरफ्तार कर कोर्ट में पेश किया गया है।




## मामला क्या है

वर्ष 2007 मुंबई अहमदाबाद हाईवे स्थित गुरुकृपा होटेल के सामने वाली झाड़ियों में एक अज्ञात व्यक्ति की लाश पुलिस को मिली थी। पुलिस द्वारा हत्या का मामला दर्ज कर छानबीन शुरू किया गया। शुरुआती जांच पड़ताल में मृतक व्यक्ति की शिनाख्त संजय विनोद झा के नाम हुई थी, मृतक झा गारमेंट्स कंपनी में मैनेजर का काम करता था और परिवार के साथ मीरारोड में रहता था। झा को बिजनेस के लिए 20 लाख रुपयों की जरूरत थी। इसलिए लोन के लिए लोन एजेन्ट ( हत्यारे ) भाईयों से मदद मांगी।

लोन पास कराने के लिए दोनों भाईयों ने झा से अधिक कमीशन मांगा था, जोकि झा देने में असमर्थ था। इसलिए झा और दोनों हत्यारों में रुपयों को लेकर झगड़ा हुआ था। इसलिए दोनों भाईयों ने झा को सबक सिखाने के लिए लोन देने के बहाने पर मुंबई अहमदाबाद हाईवे स्थित कर्नाल पाडा बुलाया गया और गला घोंटकर झा की हत्या कर दी। हत्या के बाद लाश की पहचान न हो इस लिए पत्थर से मुँह कुचल दिया और लाश को वही पास की झाड़ियों में फेंक कर भाग गए। हत्या के बाद दोनों सगे भाइयों ने अपना नाम बदल कर हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, उत्तरप्रदेश आदि जगहों पर अपनी पहचान छुपाकर पुलिस से लूका छुपी खेल-खेल रहे थे। लेकिन क्राईम ब्रांच यूनिट 03 पीआय प्रमोद बड़ाख और उनकी टीम ने हत्यारे दोनों सगे भाइयों को 16 साल के बाद पकड़ने में कामयाबी हासिल की।

Scanned with CamScanner